ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

# शाश्वत विकासात महिलांची भूमिका

*** डॉ. निलीमा कर्मजीत सिंह (Dlit)**

**प्राचार्य, डॉ. राम रोडगे बीएड महाविद्यालय (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), सेलु, जि . परभणी.*

**गोषवारा :**

*यूनायटेड नेशन्स द्वारा 2015 साली झालेल्या न्यू यॉर्क समीट घटनेत शाश्वत विकास उद्दिष्टे (SDG) 2030 पर्यंत विविध सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी एक व्यापक जागतिक अजेंडा म्हणून तयार करण्यात आला होता. ही उद्दिष्टे साध्य करण्यात महिलांची भूमिका महत्त्वाची आणि बहुआयामी आहे. संशोधन पेपर मध्ये नमूद मुद्दे हे शाश्वत विकास साध्य करणाऱ्या महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख व त्या बद्दल संक्षिप्त माहिती आपणास प्रदान करते. या संशोधन पेपरमध्ये विविध गोष्टींचा समावेश असून शाश्वत विकासाचे अर्थ, गरज, महत्वाचे घटक, व परिणाम अश्या अनेक घटकांवर विशेष माहितीची नोंद केलेली आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व पर्यावरणीय या क्षेत्रात महिलांची भूमिका, योगदान व कर्तुत्व सुद्धा यात स्पष्ट केलेले आहे. काळाची गरज ही समानता, शिक्षण, सक्षमीकरण हे असून आज महिलांचे स्थान जागतिक पातळीवर उंचावणे आवश्यक झाले आहे कारण स्त्री सशक्त व साक्षर झाली आणि प्रगतिशील असली, की ती समाजाचा विकास घडवून आणते. म्हणूनच स्त्री चे महत्व आणि तिची भूमिका लक्षात घेणे महत्वाचे आहे. शाश्वत विकासाचे ध्येय हे तिच्या विविध रूपाने, प्रयत्नाने व सहकार्याने पार पडत आहे आणि पुढे देखील यशस्वीरीतीने पार पडेल कारण स्त्री ही समाजाचा अविभाज्य भाग आहे. संशोधन पेपर चे भार स्त्री संशक्तीकरण व समानतेचा पाया उभारण्यावर आहे ज्याने SDG चे 17 लक्ष साध्य करता येतील.*

**Key words** - *भारतीय संस्कृती, शाश्वत जीवन*

**Copyright © 2024 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**प्रस्तावना:**

"यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः"

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांना पूज्यनिय स्थान आहे. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांना समान दर्जा देण्याच्या संदर्भात कायद्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न झाले. भारतीय राज्यघटनेत स्त्री-पुरुष यांच्यामध्ये कोणताच फरक न करता दोघांनाही समान अधिकार प्रदान करण्यात आला. स्त्री ही पुरुषाप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात उत्तम भूमिका पार पाडू शकते. या साठी कायद्याने संविधानामध्ये त्यांना समानतेचा अधिकार दिलेला आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यावर आधारित मूल्ये विकसित व्हावी त्याकरीता स्त्रियांना शिक्षित होणे गरजेचे असते. यात कोणताही लिंग भेदभाव न करता सर्व क्षेत्रात स्त्रियांना पुढे येता येते. महिलांचे योगदान शाश्वत विकास साधण्यातील विविध क्षेत्रांमध्ये साकारात्मकपणे दिसते. त्यांनी सामाजिक, आर्थिक, आणि पर्यावरण स्तरावर एकत्र केलेले लक्ष यशस्वीपणे साधले आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

स्त्री शिक्षणात सर्वात महत्वाची भूमिका क्रांतीज्योती संवित्रीबाई फुले यांची होती. पूर्वीच्या काळी स्त्री शिक्षणाला दुय्यम स्थान होते. स्त्री शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी महात्मा ज्योतीभा फुले यांनी स्त्री शिक्षणाला दिशा दिली. या दाम्पत्यामुळे स्त्रियांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पडला. सावित्रीच्या लेकिना समाजात स्थान उंचावण्याचा बहुमान मिळाला. स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात स्वत:ला सिद्ध केले. "अज्ञाताकडुन ज्ञाताकडे" जाण्याचा मार्ग स्त्री शक्तीला मिळाला. महिलांना प्रोत्साहन दिल्यास त्या शाश्वत विकासात आपले योगदान व त्या संदर्भात जनजागृती घडवून आण्यास सहकार्य करू शकतात. आर्थिक, सामाजिक व पर्यावरणाच्या दृष्टीकोणाने देखील ते कार्य करण्यास सक्षम ठरतील म्हणूनच त्यांचा विकास हे एक प्रकारे शाश्वत विकासाचे भार समानतेने वाटून त्या करीता फायदेकारी असणार हे U.N.G.A द्वारा घोषित शाश्वत विकासासाठी नमूद 17 लक्षामध्ये देखील समावेश आहे.

**शाश्वत विकासाचे अर्थ:** वर्ल्ड कमिशनचे पर्यावरण आणि विकास संदर्भात झालेल्या 'अवर कॉमन फ्यूचर' अहवालामध्ये "शाश्वत विकास" या संकल्पनेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे , "शाश्वत विकास म्हणजे असा विकास की जो भविष्यकालीन पिढ्याच्या त्यांच्या स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी कोणतीही तडजोड न करता सध्याच्या गरजा पूर्ण करणे होय."

शाश्वत विकास हा आर्थिक विकास, सामाजिक विकास आणि पर्यावरण या तीन महत्त्वाच्या पैलूंवर आधारलेला मानला जाऊ शकतो आणि या शिवाय चौथे घटक "सांस्कृतिक विविधतेचे जतन" महत्वाचे आहे असे युनेस्कोने (U.N.E.S.C.O) सांगितले. एका अहवालात म्हटले आहे की, "शाश्वततेचे ध्येय आणि खरोखरच अंतिम परीक्षा विकास म्हणजे आर्थिक विकास, सामाजिक विकास आणि पर्यावरण संरक्षण होय."

United Nations General Assembly द्वारे Sustainable Development Goals म्हणजेच शाश्वत विकासाचे लक्ष 2015 साली स्वीकारण्यात आले आणि 2030 पर्यन्त हे लक्ष साध्य करण्याचे ठरविण्यात आले होते. या कार्यात विविध राष्ट्रांचा सहभाग व समर्थन असून सामाजिक, आर्थिक तसेच शैक्षणिक स्तरावर देखील सरकार व खासगी संस्थांचे योगदान अपेक्षित आहे. त्या मध्ये सर्व प्रकारचे नागरिक, संस्था, संघटन , व्यक्ति, व इत्यादींचा सहभाग महत्वाचा असून मुळ म्हणजे त्यात महिलांची भूमिका आपरिहार्य आहे. स्त्री ही विविध क्षेत्रात तसेच रूपात कार्य करीत असते तिची भूमिका एक गृहिणी, उद्योजक, शिक्षिका, वा नेता, कोणतीही असून ती कौटुंबिक, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक अश्या विविध क्षेत्रात सक्षम आहे. शाश्वत विकास साधण्यासाठी यु.ऐन.जी.ए. (U.N.G.A) द्वारा घोषित लक्ष्यांची यादी खालीलप्रमाणे आहे -

1. दरिद्रता मिटवणे.

2. भुकमारी मिटवणे.

3. चांगले आरोग्य आणि स्वास्थसेवा उपलब्ध करणे.
4. उत्तम शिक्षण सुविधा उपलब्ध करणे.
5. लिंग समानता (स्त्री-पुरुष समानतेचे सक्षमीकरण).
6. शुद्ध पाणी आणि स्वच्छता सुनिश्चित करणे.
7. सुसाध्य आणि शुद्ध ऊर्जा पुरवणे.
8. योग्य रोजगार आणि आर्थिक विकास घडवणे.
9. उद्योग आणि आविष्कार करीता संधी उपलब्ध करणे.
10. असमांतेचे अंतर कमी करणे.
11. शाश्वत शहर आणि समुदाय घडविणे.
12. उत्तम उपभोक्ता आणि उत्पादन सुनिश्चित करणे.
13. परस्पर बदलते हवामान संतुलित करणे आणि त्यामुळे होणारे घातक परिणाम कमी करणे.
14. जलाशयांतर जीवन टिकवणे.
15. जमिनीवरचे जीवन टिकवणे.
16. शांती, न्याय आणि मजबूत संस्थाने यांचे महत्व विश्वयुद्ध आणि इत्यादी होणाऱ्या घटनेला टाळायला व शांतीपूर्वक त्यावर समाधान काढण्या करीता गरजेचे असल्यास त्यांचे संरक्षण करणे.
17. लक्ष्यांसाठी एकजुटपणे विविध देशांची तसेच सामाजिक, आर्थिक व व्यावसायिक पातळीवर विशेष भूमिका पाळत असलेली सरकारी किंवा खासगी संस्था व व्यापरिमंडळ (कंपनी) यांचे समर्थन.

**शाश्वत विकासामध्ये लिंग समानतेचे महत्व आणि महिलांची भूमिका:** शाश्वत विकसामध्ये महिलांचे योगदान मिळावे आणि प्रगती  व उन्नती व्हावी त्याकरीता त्यांचे समर्थन, समावेश तसेच कार्य करण्यास सहभाग हे अत्याधिक आवश्यक आहे म्हणूनच समानतेला महत्व देणे गरजेचे ठरते. U.N.G.A ने नमूद केलेल्या 17 लक्षा पैकी पाचवे लक्ष म्हणजेच लिंग समानतामध्ये दिलेल्या स्त्री-पुरुष समानता ह्यात सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्तरावर लिंग भेद न करता समानतेचे सक्षमीकरण तसेच प्रचार-प्रसार करणे हे महत्वाचे असून, लैंगिक समानता प्राप्त करण्यासाठी लिंग तटस्थता (Gender Neutrality) मान्य करणे महत्त्वाचे आहे हे लक्षात घेतले पाहिजे, व त्यांचे हक्क कायदेशीरपणे कुठलेही भेदभाव न करता समानतेने देण्यात यावे हे लक्षात येते.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

या करीता खालील बाबींचा समावेश करण्यात येतो -

1. समान अधिकार.

2. समान शिक्षण.

3. स्वास्थसेवेचे समान लाभ आणि चांगले आरोग्य.

4. आर्थिक व सामाजिक प्रगती.

5. निर्णप्रक्रियेत महिलांचा सहभाग.

महिलांना समान स्थान देण्यात आल्यानंतर त्या प्रगतिशील होतील. त्यांना कार्य करण्यास प्रोत्साहित केल्यास त्या ठामपणे शाश्वत विकासाचे लक्ष ध्यानात ठेवून पुढे वाटचाल करतील व शाश्वत विकासाचे लक्ष साध्य करतील. महिलांच्या योगदानाचे महत्व स्पष्ट करण्यास उदाहरण द्यायचे म्हणजे, पर्यावरणीय चळवळीतील महिला नेत्यांनी अनेकदा शाश्वत पद्धती, जैवविविधता संवर्धन (biodiversity conservation) आणि हवामान बदल (climate change) कमी करण्यासाठी योगदान दिले होते. औद्योगिक विकासाबरोबरच पर्यावरण संरक्षित करण्याहेतू महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांचा समावेश आहे जे वाजवी व्यापार, पर्यावरणास अनुकूल पद्धती आणि समुदाय कल्याण यांना प्राधान्य देतात. आज कित्येक असे उद्योग स्थापित करण्यात आले आहे जे पर्यावरण व मानवाच्या हितकरीता आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून कुठल्याही प्रकारची क्षती न करता विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आढळून येते. महत्वाचे म्हणजे असले उद्योग चालविणाऱ्या उद्योजकामध्ये आज स्त्रियांचा देखील समावेश आहे. कित्येक असे पर्यावरणाला अनुकूल असलेले आविष्कार स्त्रियांद्वारा विकसित केले गेले आहे.

**शैक्षणिक विकासात महिलांची भूमिका:**

आधुनिक काळात शैक्षणिक विकासात महिलांची भूमिका अनन्य साधारण आहे. 'शिक्षित स्त्रियांशिवाय सुशिक्षित समाज तयार होऊ शकत नाही'. स्त्री बहुआयामी स्वरूपाची असून तिचा प्रभाव संपूर्ण जगाच्या कार्यावर खोलवर पडतो कारण समाजाचा महत्वपूर्ण घटक स्त्रिया आणि मुली आहेत. सामाजिक उन्नती स्त्रियांचा फार मोठा वाटा आहे. प्रत्येक क्षेत्रात स्त्रीने तिच्या कर्तृत्वाने स्वत:ला सिद्ध केले आहे. उच्च शिक्षणात ती पुरुषाच्या बरोबरीने प्रत्येक शैक्षणिक कार्यात महत्वाची भूमिका बजावत आहे. त्यामुळे शाश्वत विकासात महिलांची भूमिका महत्वपूर्ण असून, शाश्वत उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांच्याकडील अद्वितीय नवनवीन कल्पना, नवनिर्मिती, नवसंकल्पना यातून शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांचा सहभाग आवश्यक असतो. शिक्षणाच्या माध्यमातून नवीन मूल्ये विकसित करून भविष्यात त्याचा वापर नवीन पिढीसाठी फायदेशीर राहील. संस्कृति संक्रमण आणि संस्कृति संवर्धन ही सांस्कृतिक परंपरा टिकविण्यासाठी स्त्रिया अग्रेसर असतात. स्त्रियांच्या

विकासात महत्वाची भूमिका शैक्षणिक क्षेत्रातून घडवून आणता येते. SDG साध्य करण्यास त्यांची मुख्य भूमिका खालीप्रमाणे आहेत –

1. **शिक्षणाची उपलब्धता :** SDG मध्ये नमूद लक्ष्यानुसार योग्य व उत्तम शिक्षण उपलब्ध करणे आणि विशेषत: मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देवून पाचवे लक्ष सुनिश्चित करणे शाश्वत विकासासाठी गरजेचे आहे म्हणून याकरिता योग्य पाऊल उचलणे महत्वाचे आहे. बदलत असलेल्या काळाची गरज अशी आहे की, स्त्री-पुरुषाला खांद्याला खांदा लावून चालावे लागते. या करीता पुरुषाणप्रमाणे स्त्री ला योग्य शिक्षण व संधी मिळणे गरजेचे आहे.
2. **साक्षरता कार्यक्रम :** महिलांच्या तसेच विश्वाच्या विकासाकरीता साक्षरतेचे प्रमाण संतुलित असणे गरजेचे आहे. शिक्षणाचा योग्य असा प्रचार-प्रसार करून साक्षरतेचे अंतर भरणे महत्वाचे आहे. दुर्लभ परिस्थितीमध्ये अळकलेले शिक्षणापासून वंचित असलेले वर्ग योग्यरीतीने पुढे यावे हे सुनिश्चित करणे व ते अंतर मिटवणे हे SDG चे मुळ लक्ष असून ते साध्य करण्यास ते प्रयत्नशील ठरते. याकरीता विविध असे उपक्रम वेगवेगळ्या स्तरावर राबविणे हे SDG चे ध्येय आहे.
3. **शिक्षक आणि मार्गदर्शक म्हणून महिलांची भूमिका :** सुशिक्षित राष्ट्र निर्मितीकरून चालू तसेच येणाऱ्या पिढीचा पाया मजबूत करणे हे अत्यधिक आवश्यक आहे म्हणूनच चांगले कुशल शिक्षक असणे गरजेचे आहे. स्त्री ही शिक्षिकांच्या रूपात तसेच आई किंवा इत्यादि महत्वाच्या भूमिकेतून मार्गदर्शिका म्हणून कार्य करीत असते. तरी तिची योग्य ती कर्तुत्वाची ओळख होत नसल्यास ती मागे पडते ज्यामुळे योग्य असे सामाजिक विकासपण होऊ शकत नाही.
4. **सामुदायिक सहभाग :** सुशिक्षित महिला घरापासूनच चांगली वळण लावून कुटुंबाच्या माध्यमातून एक जबाबदार समुदाय घडवित असते. जरी शिक्षणाचा पाया कमकुवत असला तरी जीवणाच्या अभ्यासाची ती ज्ञाता असते. कुठलेही सामाजिक नेतृत्व करण्यास ती तत्पर असते. सामुदायिक व्यवस्थेमध्ये जरी तिचे स्तर लहान असले तरी भूमिका मात्र महत्वाची असते आणि विविध उपक्रमाद्वारे ती सिद्ध करीत असते.

**आर्थिक विकासात महिलांची भूमिका :** शाश्वत विकासासाठी सामाजिक दृष्टीने आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणात आढळून येते. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणारे उपक्रम दारिद्र्य कमी करण्यास, विषमतेचे प्रमाण मिटवण्यास आणि शाश्वत उपजीविकेसाठी योगदान देण्यास सहकार्य करते. सामाजिक आणि आर्थिक समानता राखण्यासाठी अर्थ व्यवस्थेच्या संदर्भात विचार होणे काळाची गरज आहे. अर्थ व्यवस्थामधील समतोलपणा राखण्यासाठी नवीन गोष्टींचा अभ्यासक्रमात समावेश मोठ्या प्रमाणावर असणे आवश्यक आहे. भविष्यात यातून स्वयं रोजगार मिळवण्यास मदत होणार, त्यातून सक्षम बनण्यासाठी मदत मिळेल व देशाच्या आर्थिक व्यवस्थेला हातभार होणार. नवीन तंत्राचा स्वीकार केल्यास

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

देशाची अर्थ व्यवस्थेत विकास होतो व स्त्रियांची बौद्धिक शक्ति मोठ्या प्रमाणात उपयोगी पडते. देशाच्या अर्थ व्यवस्थेत समतोलपणा राखण्याच्या उद्देश्याने एतिहासिक काळापासून तर आधुनिक काळात महत्वाची भूमिका आहे. आज देशाच्या आर्थिक उलाढालीत स्त्रियांनी आपले वर्चस्व वाढविले आहे. भविष्यात येणाऱ्या पिढीसाठी नवी तरतूद करण्याचे कार्य स्त्री शक्ति करीत आहे. देशात स्त्री व पुरुष यांच्यात आर्थिक समानता आणून सर्व साधारण मानवाच्या मूलभूत गरजा भविष्यात पूर्ण करण्यासाठी येणाऱ्या भावी पिढ्याकरीत योग्य तरतूद, नवीन संसाधने उपलब्ध करून शाश्वत विकास साधता येईल तसेच यातून महिलांचे सक्षमीकरण निश्चित करता येते. ज्यामुळे देशाचा आर्थिक विकास साधण्यास मदत मिळेल. देशाच्या आर्थिक विकासात, आर्थिक स्तर हा स्त्रियांच्या योगदाणातून उच्चांकावर जाण्यास मदत होईल. राष्ट्र उन्नतीत आर्थिक विकास साधण्यास स्त्री नव्या शतकात अत्याधिक सक्षम राहून राष्ट्रहीत व कौटुंबिक हीत साधण्यास महत्वपूर्ण भूमिका पार पडेल. महिलांची काही मुख्य भूमिका नमूद करायचे झाल्यास ते खालीलप्रमाणे आहेत –

1. **उद्योगजक नेतृत्व :** महिलांचे सक्षमीकरण करण्यास तसेच त्यांना रोजगार आदींची सुविधा उपलब्ध करून देण्यास, योग्य असे प्रशिक्षण मिळवून त्यांचे विकास घडवून आण्यास स्त्री शक्तीची मुख्य भूमिका दिसून येते कारण महिलांच्या प्रगतिशील होण्यास त्यांना प्रोत्साहित करणारी ही महिला असते. या उपक्रमांमुळे महिला आत्मनिर्भरतेकडे वळतात व SDG मध्ये नमूद पहिले लक्ष म्हणजेच 'दरीद्रता मिटवणे' हे साध्य करण्यास सक्षम ठरतात.
2. **समान वेतन आणि योग्य काम :** महिला पुरुषांप्रमाणे समान संधी मिळवून योग्यरीतीने कार्य करण्यास प्रयत्नशील असून, ती एक समान अधिकार व वेतन प्रदान करून इतर महिलांच्या विकासात तसेच देशाच्या विकासात योगदान करण्यास पुढाकारी आहेत हे SDG 8 ला साध्य करण्यास लाभकारी ठरते. सामाजिक उपक्रम आणि प्रभावी गुंतवणूक या क्षेत्रातसुद्धा महिलांची वाटचाल होऊन आठवे लक्ष साध्य होते.
3. **आर्थिक संशक्तीकरण :** स्त्री ही आत्मनिर्भर राहून दरीद्रतेचे अंतर कमी करण्यास, महिलांचे सामाजिक व आर्थिक विकास करण्यास, त्यांचे सक्षमीकरण आणि आर्थिक स्वतंत्रता मिळवून देण्यास महत्वाची भूमिका पार पाडते जे SDG मध्ये नमूद 1 आणि 5 लक्ष सफलतेपूर्वक साध्य करण्यास सक्षम ठरतात.
4. **उद्योगीक नेतृत्व आणि विविधता :** महिला संशक्तीकरण हे विज्ञान, आधुनिकता, अभियांत्रिकी आणि गणित या क्षेत्रात प्रगतिशील असून महिलांचे स्तर उंचवण्यास मदतगार ठरते. विविध क्षेत्राचे कार्यभार महिलांनी प्रभावीपणे पार पाडले असून त्या उत्तम नेतृत्व करण्याची क्षमता ठेवतात हे कळून येते.
5. **कृषि क्षेत्र :** महिलांची भूमिका कृषि क्षेत्रात सुद्धा आढळते. स्त्री ही कृषिविज्ञान या विषयात देखील कुशल असून पौराणिक काळापासून ते आधुनिक तंत्रविज्ञानाच्या काळात सुद्धा ती उत्कृष्ट कार्य करताना आढळते. जुन्या नवीन पद्धतीच्या

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

सहकार्याने कृषिविकासात महिलांचे अमूल्य योगदान आहे. ती फक्त भाकरी थापण्यास सक्षम नसून त्यात वापरले जाणारे धान्य उत्पन्न करण्याचे कौशल्य ठेवते व त्या मागचे विज्ञान तिला ज्ञात असून ती या क्षेत्रात सुद्धा सशक्त आहे.

**सामाजिक विकासात महिलांची भूमिका:** मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. समाजात मनुष्याची महत्वाची जबाबदारी असते. समूहाच्या माध्यमातून व्यक्ति हा सतत समाजाची प्रगती साधत असतो. पूर्वीच्या काळी समाज निर्मिती ही वर्ण व्यवस्थेवर आधारित होती. स्त्री चे स्थान स्वीकृत नसून सुद्धा ती स्वत:ला सिद्ध करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात उत्तम कार्य करून भावी पिढीला प्रेरणात्मक राहली आहे, हे तिच्या गौरवशाली इतिहासवरून जुनी-नवीन पिढीस लक्षात येते. तरी येणाऱ्या पिढी पर्यन्त हा इतिहास टिकवणे गरजेचे असून त्यांना योग्य ते ज्ञान पोहचवणे महत्वाचे आहे जेणेकरून ते स्वत:च्या विकासासाठी सक्षम राहणार. भविषाचा विचार करून समाजातील वाईट प्रथा परंपरा यांना तडा देणे व सामाजिक वारसा जोपासण्यासाठी आधुनिक काळातील महत्वाची भूमिका विविध स्वरूपात मनुष्य साधत असतो. त्यात महिलांचे मुख्य रूप वेगवेगळ्या भूमिकेतून आढळते जसे - समाज सेविका व राष्ट्र सेविका या मध्यमातून ती देशाच्या कार्यात सहकार्याची भूमिका पार पाडत असते. स्त्रियांमुळे सामाजिक संतुलन समतोल असते. भविष्यात समाजासाठी विविध योजनांचा लाभ मिळविण्यासाठी, भावी पिढीचा उद्धार करण्यासाठी व शाश्वत विकास साधण्यासाठी सामाजिक संतुलन ठेवण्याची अत्याआधिक गरज आहे. महिलांचे शाश्वत विकासाचे लक्ष साध्य करण्यात विशिष्ट योगदान खालील घटकांद्वारे लक्षात येते -

1. **सामाजिक समानता :** सामाजिक पातळीवर समान अधिकार व स्थान मिळाल्यास सामाजिक विकास शक्य आहे, त्याकरीता समानतेला वाव देणे आजच्या काळी गरजेचे आहे.
2. **सामुदायिक विकास व सक्षमीकरण :** समाजाच्या विकासाकरिता प्रत्येक वर्गाला व्यक्तिगत विकास असणे व त्यांना योग्य ती संधी, सुविधा व मार्गदर्शन महत्वाचे आहे, याकरिता समानतेने विशेष उपक्रमात वंचित वर्गाचे समावेश व सहभाग असणे तसेच त्यांच्या पर्यन्त अनुकूल माहिती पोहचविणे हे सामाजिक दृष्टीकोणातुण महत्वाचे आढळते.
3. **मानवी हक्क :** समाजात वावरतांना प्रत्येक व्यक्तीला काही मूलभूत अधिकार दिलेले असून त्यांना त्याची संपूर्ण माहिती पुरवणे व त्यांचा कुठल्याही प्रकारे छळ होऊ नये हे सुनिश्चित करणे अत्याआधिक गरजेचे आहे.
4. **सांस्कृतिक संवर्धन :** आपली संस्कृति टिकविणे व त्याचे संरक्षण करणे हे सामाजिक विकास घडविण्यास महत्वपूर्ण घटक आहे.

**आरोग्य विकासात महिलांची भूमिका:** पूर्वीच्या काळापासून नैसर्गिक उपचाराचे महत्व प्रचलित असल्याने घरघुती उपाय सुप्रसिद्ध होते. काळ कोणतेही असले तरी घरघुती उपचार म्हटले की आई आणि आजींची आठवण येणे स्वाभाविक आहे. स्त्री ही शिक्षित असो वा अशिक्षित ती वैद्यकीय क्षेत्रात पूर्वीपासून कुशल असून नैसर्गिक व आधुनिक शास्त्रानुसार उपचार

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II

MARCH – APRIL 2024

Original Research Article

करण्यास समर्थ होती. स्त्री ही उत्तम चिकित्सक असते, ती पारंपरिक पद्धतीने प्रभावी उपचार करण्याची पद्धतींचे जतन करून पुढील पिढ्यांना ते ज्ञान पोहचवते. आरोग्य स्वास्थ टिकवणारे काही महत्वाचे घटक म्हणजे पौष्टिक आहार, संतुलित जीवनशैली बाळगणे, योग प्राणायाम, इत्यादि असतात. उत्कृष्ट आरोग्य जपणारे एक महत्वाचे घटक म्हणजेच पौष्टिक आहाराद्वारे योग्य पोषण शरीराला मिळणे हे स्वास्थ चांगले ठेवण्यास मदतगारी असते. पोषण चुकले व आरोग्य टिकवणारे तराजू असमतोल झाले तर सुखरूप दिसणारी मानसे रोगग्रस्त होतील आणि याचे दुष्परिणाम येणाऱ्या पिढीवर पडेल. रोग निर्मूलन करण्यासाठी व रोग मुक्त परिसर घडविण्यास चांगले आहार अतिशय महत्वाची भूमिका पार पाडतात.

समाजाला चालवणारे दुसरे महत्वपूर्ण घटक हे कुटुंब नियोजन असून मानव जातीवर व त्यांच्या आरोग्यावर याचे खोलवर प्रभाव पडते. कुटुंब नियोजनमध्ये स्त्री चे प्रमुख स्थान असून संसाराची जननी म्हणून तिची ओळख असते पण तरी तिला तिच्या मुळ अधिकारांची जाणीव व माहिती नसते. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाळीत असताना तिच्या खांद्यावर संसाराचे भार मांडले जातात या मध्ये आपले कुटुंब नियोजन कसे करावे? हे समविष्ठ असते. महिलांना कुटुंब कसे नियोजित करायचे आहे हे त्यांच्या वयक्तिक निर्णयावर आधारित असून त्या संदर्भात कुठलेही निर्णय त्यांचे स्वत:चे असायला पाहिजे हे निर्धारित करणे गरजेचे आहे. स्त्री रोगाविषयी जनजागृती असणे व त्या संदर्भात योग्य ती माहिती प्रत्येक स्त्री ला ज्ञात असणे गरजेचे आहे. प्रसार प्रचाराद्वारे आवश्यक उपाय व वैद्यकीय माहिती पिढी दर पिढी पोहचवणे आणि त्याचे संवर्धन करणे काळाची गरज आहे.

**पर्यावरण विकासात महिलांची भूमिका:**

शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये नमूद केलेली पर्यावरणीय शाश्वततेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पर्यावरण विकासात महिलांचे योगदान आवश्यक आहे. त्यांचा सहभाग विविध क्षेत्रांमध्ये पसरलेला आहे, जो शाश्वत विकासाच्या पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक पैलूंच्या परस्पर संबंधांला प्रतिबिंबित करतो. आधुनिक काळाच्या गरजा लक्षात घेऊन सध्याचे व्यवस्थापन समतोलपणे सक्रिय राहायला हवे. तांत्रिक प्रगती झपाट्याने होत असल्यास औद्योगिक क्रांति, पर्यावरण प्रदूषण, हवामानात तसेच जीवनशैलीत झपाट्याने बदल होत आहे. याचे दुष्परिणाम पर्यावरणवर होते, ते टाळण्यासाठी विविध बाबींचे बोध होणे गरजेचे आहे. यात सागरी संवर्धन, जैविविधता संवर्धन, प्रदूषण नियंत्रण, इत्यादींचा समावेश आहे. पर्यावरण स्वच्छ ठेवण्याकरीता खालील गोष्टी लक्षात घ्यावे-

1. काचरा व्यवस्थापन यंत्रणा
2. कचऱ्याचे वर्गीकरण
3. हानिकारक रासायनिक कचऱ्याचे पृथक्करण

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II

MARCH – APRIL 2024

Original Research Article

4. वाहनातील प्रदूषण नियंत्रण
5. सागरी जीवनाचे संवर्धन
6. जैवविविधता संवर्धन

**समारोप:**

शाश्वत विकासामध्ये महिलांची भूमिका वरील महितीद्वारा स्पष्ट होते. तिचे कार्य तसेच भूमिका हे मोलाचे आहे म्हणून तिच्या संशक्तीकरणाला वाव देणे गरजेचे आहे असे कळून येते. महिलांची प्रगती ही जगाची प्रगती आहे व त्याने कुठलेही ध्येय साध्य करता येते हे या पेपरच्या माध्यमातून स्पष्ट होते. शाश्वत विकासाकळे जाणारे मार्ग हे चार अत्यधिक महत्वाच्या स्तंभावर आधारलेले आहे ते म्हणजे – आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणीय विकास होय. या विविध क्षेत्रात महिलांचे कार्य उल्लेखनीय असून त्यांची भूमिका यशस्वी जग घडविण्यासाठी अत्यधिक आवश्यक आहे. सुरू पिढी असो वा पुढील पिढी, त्यांचे कारभार व अस्तित्व हे महिलांवरच अवलंबून आहे. जगाच्या हिताकरिता महिलांचे स्थान उंचावणे व तिला नेतृत्वाची योग्य संधी देणे फार गरजेचे आहे. गृहिणी वा औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक म्हणून तिची ओळख असो, तिची उपस्थिती मात्र सामाजिक विकासासाठी अनिवार्य आहे. महिलांच्या पावलांनी घर व समाज दोन्ही चालतात तर तिचे योगदान ध्यानात घेणे आजच्या काळाची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1. *U.N.E.C.E paper on " Empowering Women for Sustainable Development" No. 2012.1.*
2. *United Nations Sustainable Development Goals 2022 report on "Transforming Our World".*
3. *Official exhibit on 2030 Agenda for Sustainable Development : 17 Goals to Transform Our World.*

***Cite This Article:***

***प्रा. डॉ. नि. क. सिंह (Dlit)*** **(2024).** *शाश्वत विकासात महिलांची भूमिका,* In Educreator Research Journal: Vol. XI (Number II, pp. 322–330). **ERJ.** ***https://doi.org/10.5281/zenodo.11032157***